**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आज दिनांक ५.८.२०२० रोजी शिक्षण (प्राथमिक) या विभागाकडील विनंती व प्रशासकीय बदल्या करण्यात आल्या बदल्यांचा चर्चावृत्तांत खालील प्रमाणे**

---

मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सातारा जिल्हा परिषद अंतर्गत सर्वसाधारण बदल्या २०२० च्या प्रशासकीय,विनंती व आपसी बदली करणेबाबत महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय दि.१५.०५.२०१४ ते आजअखेर बदलीच्या अनुषंगीक/ बदलीबाबत शासन निर्णयामधील तरतुदी सर्वाना समजावून सांगितल्या तसेच समुपदेशनाच्या वेळी प्रकरण १ मधील अनुक्रमांक ४ मध्ये विहित केलेल्या प्राधान्यक्रमानुसार बदल्यांची प्रक्रिया पार पाडण्यात यावी व तसेच शासन निर्णयामधील भाग २(२) नुसार जागा भरावयाची कार्यवाही केल्यानंतर उर्वरित तालुक्यातील रिक्त पदे भरताना भरलेल्या पदांचा प्रत्येक तालुक्यात समतोल राखण्यात यावा तसेच भाग ४ ड ज्या भागात/तालुक्यात सर्व पदे भरणे आवश्यक आहे ती वगळून तालुक्यातील सममोल साधला जाईल याबाबत सुचना दिल्या. तसेच ज्या विभागात/तालुक्यात एकूण पदांच्या समानीकरणानुसार कमी पदे कार्यरत आहेत अशा विभागात/तालुक्यातील कर्मचारी विनंती बदली कार्यरत पदांचा समतोल राखण्यासाठी मान्य करता येणार नाही.

समानीकरणानुसार प्राधान्यक्रमाने प्रशासकीय १० टक्के व विनंती ५ टक्के बदली प्रक्रीया करण्यात येत आहे. तथापि प्रशासकीय १० टक्के बदल्या पात्र कर्मचारी उपलब्ध न झाल्यास विनंती बदलीची टक्केवारी ५ टक्केवारी वरुन वाढवण्यात एकूण १५ टक्केवारी पर्यत बदल्या करण्यात येईल. प्रक्रीया सुरु करणेबाबत सुचित केले.

शिक्षण (प्राथमिक) या विभागाकडील केंद्र प्रमुख या संवर्गाच्या विनंती बदल्या दुपारी १.४९ वाजता सुरु करण्यात आल्या

**संवर्ग-केंद्र प्रमुख- एकूण मंजुर पदे-२२३, कार्यरत पदे -८६, रिक्त पदे १३७**
**पाच टक्के प्रमाणे करावयाच्या बदल्या-०४**

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी:-** कोरेगाव,खटाव,फलटण व माण येथील प्रत्येकी १ पद समानिकरणानुसार रिक्त दाखवण्यात आलेली आहेत. या चार रिक्त पदाच्या ठिकाणावरुन कोणत्याही कर्मचा-याला बाहेर जाता येणार नाही. तथापि बाहेरील कर्मचा-याला त्या ठिकाणी जाता येईल तसेच आपसी बदलीने ही जाता येईल. एकूण०४ बदल्या करावयाच्या आहेत.

- श्री. नारायण विष्णु आवळे- इच्छित ठिकाणी पद रिक्त नसल्याने नकार दिला.
- श्री.विजयकुमार शिवराम देशमुख- गैरहजर
- श्री.अनिल बुवासाहेब कदम – ग.शि.अ. कार्यालय पं.स.फलटण येथे बदली देणेत आली.
- श्री.रामचंद्र परशराम गायकवाड- इच्छित ठिकाणी पद रिक्त नसल्याने नकार दिला.
- श्री.सुरेश दाजा भुरकुंडे- इच्छित ठिकाणी पद रिक्त नसल्याने नकार दिला.
- श्री.दादाजी देवाजी बागुल-इच्छित ठिकाणी पद रिक्त नसल्याने नकार दिला.
- श्री.विजय पिलाजी भांगरे-इच्छित ठिकाणी पद रिक्त नसल्याने नकार दिला.
- श्री.विठठल अंकुश माने-गैरहजर
- श्री.मधुसुधन राजाराम सोनावणे-गैरहजर

Scanned with CamScanner

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी:-श्री.अनिल बुवासाहेब कदम यांची ग.शि.अ. खटाव येथुन ग.शि.अ. कार्यालय पं.स.फलटण येथे बदली करण्यात आली**

**संवर्ग- विस्तार अधिकारी (शिक्षण) एकूण मंजुर पदे-७८, कार्यरत पदे -३०, रिक्त पदे ४८पाच टक्के प्रमाणे करावयाच्या प्रशासकीय बदल्या-०३**
**वेळ-२.०५**
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी:-** सातारा,खटाव,महाबळेश्वर, जावली व कराड येथील प्रत्येकी १ पद समानिकरणानुसार रिक्त दाखवण्यात आलेली आहेत. या पाच रिक्त पदाच्या ठिकाणावरुन कोणत्याही कर्मचा-याला विनंती बदलीने बाहेर जाता येणार नाही. तथापि बाहेरील कर्मचा-याला त्या ठिकाणी जाता येईल तसेच आपसी बदलीने ही जाता येईल. एकूण०३ बदल्या करावयाच्या आहेत.

- श्रीमती प्रतिभा विश्वनाथ भराडे- ग.शि.अ. कार्यालय पं.स.खटाव येथे प्रशासकीय बदली करण्यात आली.
- श्रीमती सुजाता विश्वनाथ जाधव- ग.शि.अ. कार्यालय पं.स.सातारा येथे पती पत्नी एकत्रिकरणांतर्गत प्रशासकीय बदली करण्यात आली.
- श्री.चंद्रकांत हणमंत कर्णे-ग.शि.अ. कार्यालय पं.स.जावली येथे सेवा जेष्ठतेनुसार प्रशासकीय बदली करण्यात आली.

वरिल प्रमाणे तीन बदल्या करण्यात आल्या.

**संवर्ग- विस्तार अधिकारी (शिक्षण) एकूण मंजुर पदे-७८, कार्यरत पदे -३०, रिक्त पदे ४८पाच टक्के प्रमाणे करावयाच्या बदल्या-०२**
**वेळ-२.३०**
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी:- सातारा**,खटाव,महाबळेश्वर, जावली व कराड येथील प्रत्येकी १ पद समानिकरणानुसार रिक्त दाखवण्यात आलेली आहेत. या पाच रिक्त पदाच्या ठिकाणावरुन कोणत्याही कर्मचा-याला विनंती बदलीने बाहेर जाता येणार नाही. तथापि बाहेरील कर्मचा-याला त्या ठिकाणी जाता येईल तसेच आपसी बदलीने ही जाता येईल. एकूण०२ बदल्या करावयाच्या आहेत.

१. श्रीमती मनिषा गिरिमल चंदुरे-इच्छित ठिकाणी पद रिक्त नसल्याने नकार दिला.
२.श्रीमती प्रतिभा विश्वनाथ भराडे- प्रशासकीय बदली झाली.
३.श्रीमती कल्पना रामचंद्र तोडरमल- पं.स सातारा हवे आहे. जावली तालुक्यात एकटीच काम करत आहे. पं.स सातारा या ठिकाणी दोन पदे रिक्त होत आहेत त्या ठिकाणी जावु शकत नाही का?

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी:-** जावली तालुका मायनस मध्ये जात असल्यामुळे आपण त्या ठिकाणाहुन बाहेर जाउ शकत नाही. जर एखादा कर्मचारी आपसी बदलीने जावली तालुक्यात यावयास तयार असेल तर आपसी बदली अंतर्गत तुमची बदली होवु शकतो.

४.श्रीमती सुजाता विश्वनाथ जाधव-प्रशासकीय बदली झाली.
५. श्री.लक्ष्मण महादेव पिसे - नो एक्झीट यांची बदली मान्य करता येणार नाही.
६.श्री चंद्रकात हणमंत कर्णे- प्रशासकीय बदली झाली.
७.श्री.एस.के.देशमाने- इच्छित ठिकाणी पद रिक्त नसल्याने नकार दिला.
८.श्रीमती वनिता मोरे-इच्छित ठिकाणी पद रिक्त नसल्याने नकार दिला.

Scanned with CamScanner

९. श्री. रमेश गणपती कांबळे-इच्छित ठिकाणी पद रिक्त नसल्याने नकार दिला.
१०.श्रीमती जमिला उस्मान मुलाणी- गैरहजर
११.श्री. विष्णु भोरु मेमाणे-इच्छित ठिकाणी पद रिक्त नसल्याने नकार दिला.
१२.श्री.नितिन महादेव जगताप- सन २०१४ मध्ये झालेल्या प्रशासकीय बदल्याच्यावेळी माझ्यावर अन्याय झाला आहे.एक बदली करावयाची असताना दोन बदल्या करण्यात आल्या त्यामध्ये मला पाटण येथे पदस्थापना देण्यात आली.

**मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**:- प्रशासनाच्या सोईच्या दृष्टीने एक किंवा दोन बदल्या करता येतात.
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी**:- तुम्हाला पाटण मधुन बाहेर पडण्याची संधी आली आहे. तुम्ही पत्र दिले आहे त्यावर मा.अध्यक्ष यांनी शिफारस केलेली आहे.श्री जगताप व श्री कांबळे या दोघांनी सामंजस्याने विचार विनिमय करुन श्री जगताप यांना पं.स.कराड येथे बदली देणेस हरकत नाही असे सांगितले वरुन श्री जगताप यांना ग.शि.अ. कार्यालय पं.स.कराड येथे विनंती बदली देण्यात आली.
याप्रमाणे शिक्षण (प्राथमिक) विभागाकडील बदली प्रक्रिया पार पडली.

SMBhagwat

Prabha
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
सातारा जिल्हा परिषद, सातारा

( संजय भागवत )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सातारा.
९४२२९९ ३३३३

Scanned with CamScanner